# कोरोना संक्रमणकाळात युवकांमोरील सामाजिक, सांस्कृतिक आव्हाने आणि संधी

**डॉ. विनोद तुळशीराम राऊत**
सहयोगी प्राध्यापक
कमला नेहरू महाविद्यालय,
सक्करदरा रोड, नागपूर

---

**गोषवारा:** (Abstract)

विपदा मानवनिर्मित असो वा नैसर्गिक असो. साधारणत जगण्यावरील त्याचा परिणाम त्या काळातील महत्त्वाची घटना असते आणि या घटनेचे पडसाद त्या काळाला स्पर्शून जाणाऱ्या परिस्थितीसह संवेदनांचा, कोलाहलाचा एक मोठा पट समकालीन सामाजिक व सांस्कृतिक जीवनावर वेगवेगळ्या प्रकारे प्रभाव टाकत असतो. मानवी समाजावरील या प्रभावाची परिणामसदृश सकारात्मकता आणि नकारात्मकता दोन्हीही जगण्याच्या विविध पातळ्यावर बरीच आव्हाने निर्माण करीत असते. सामाजिक पातळीवर विविध प्रकारच्या अडचणी अचानक समोर आल्यामुळे संकटाची तीव्रता प्रचंड वाढलेली असते. आर्थिक विकासाची गती स्थिरावल्यामुळे कालसापेक्ष व परिस्थितीजन्य  बेरोजगारी, भूकमरी, मृत्यूप्रमाण, मागसलेपण इ. बाबी वेगाने समोर येतात. त्याचा एकंदरीत परिणाम सामाजिक जीवनावर खोलवर प्रभाव टाकत असतो. अशा आव्हाननात्मक परिस्थितीत खरा प्रश्न असतो तो प्राथमिक गरजांच्या उभारणीचा. अशावेळी योग्य नियोजन व सकारात्मक वातावरणच संधीची दारे खुली करीत समाजाला नव्याने उभारी देऊ शकते.

**पारिभाषिक शब्द:** (keywords)

कोरोना संक्रमण, वैश्विक आपत्ती, युवक, परिस्थितीजन्य आव्हाने, सामाजिक, सांस्कृतिक परिणाम, पडसाद, संधींच्या शक्यता.

**प्रास्ताविक** : (Introduction)

कोरोना महासंकट काळात निर्माण झालेली परिस्थिती पाहता सुरूवातीलाच नमुद केले पाहिजे की, संक्रमणकाळाचा प्रभाव जगभरातील मानवी समाजावर व त्याने समाजाच्या उन्नतीसाठी उभारलेल्या एकूणच विकासप्रक्रियेवर झालेला आहे. या महासंकटाचा प्रभाव जसजसा ओसरत जाईल तसतसे तत्कालीन परिस्थितीचे आकलन अधिक स्पष्ट होत जाईल. सध्या आपण संक्रमणकाळात आहोत. त्यामुळे हा प्रभाव आर्थिक व सामाजिक पातळीवर परिणाम करीत आहे. भूक, गरिबी, बेरोजगारी, उपासमार कोरोनापूर्व काळात मोठ्या प्रमाणात होती, ती संक्रमण काळात कामबंद असल्यामुळे प्रचंड वाढलेली आहे. अर्थव्यवस्था रसातळाला गेल्याची आकडेवारी लक्ष वेधून घेत आहे. आंतरराष्ट्रीय नाणेनिधीने व्यक्त केलेला आर्थिक नुकसानीचा प्राथमिक स्वरुपातील अंदाज नऊ लाख कोटी डॉलर्स म्हणजे जपान आणि जर्मनीच्या एकत्रित राष्ट्रीय उत्पन्नाएवढा किंवा भारताच्या उत्पादनाच्या तीन पट इतका आहे. या आर्थिक नुकसानीबरोबर रोजगारात होणारी घट व त्यामुळे दारिद्र्यात होणारी वाढ संयुक्त राष्ट्र संघाच्या अहवालात नमुद असून केवळ भारतातच ४० कोटी लोक दारिद्र्यरेषेखाली ढकलले जातील असे नोंदविलेले आहे.’’[१]

कोरोना प्रादुर्भावामुळे प्रत्येक क्षेत्रातील अनिश्चितता उत्तर काळातील मानवी वास्तव किती भयावह असेल, याची नांदी देत आहेच अशात एकीकडे कोरोना संक्रमणात या विषाणूचा वावर संपणार का, की पुढेही याच परिस्थितीत जगावे लागणार, अशी वैश्विक चिंता जीव धरत आहे. दुसरीकडे शक्य तितक्या उद्योग क्षेत्रांना संजीवनी देत सर्व व्यवहार नियमित सुरू करून मानवाला या महामारीतून बाहेर काढण्यासाठी धडपडत केली जात आहे. जीवनावश्यक बाबींच्या प्रतिपूर्तीसाठी प्रयत्नाची पराकाष्ठा करीत मानवी जगण्याला उभारी देण्याचा प्रयत्नही उल्लेखनीय आहे. असे म्हणतात की, संकटापासून मिळालेले बळ इतिहास निर्माण करणारे ठरते. कारण 'वर्तमानातील संकटाचा शत्रू भविष्यातील नव्या संधीची दारे उघडणारा मित्रच असतो' परंतु हे तेव्हाच शक्य असेल जेव्हा निसर्गचक्र आणि जीवसृष्टीतील संवादी समतोल संयमाने उभारून संपूर्ण मानवी जग नैष्ठिक पातळीवर कृत्रिमतेपेक्षा नैसर्गिक विकासप्रक्रियेत सामील होईल. वैचारिकदृष्ट्या हे वास्तव प्रतिबिंबीत व्हायचे असले तर आज भारताने त्रेसृष्ट कोटी भारतीय तरूणांपुढे सर्वसमावेशक संधीचा व्यापक कार्यक्रम पोचविला पाहिजे; ज्यामुळे भारतीय समाजाचा प्रवास आत्मनिर्भरतेकडे होत आहे, असे म्हणता येईल.

**कोराना प्रादुर्भाव व जागतिक वास्तव :**

आज आपण कोरोना महामारीच्या प्रादुर्भावात वावरत आहोत. एकीकडे या आजाराचा प्रादुर्भाव झपाट्याने वाढत असून सद्यस्थितीत तिसरी लाट दारावर आ वासून उभी आहे. त्यात शेती, उद्योग, व्यापार, शिक्षण आणि या सर्व क्षेत्रांना जोडणारे सेवाक्षेत्र व त्यावर अवलंबून असलेला मजूरवर्ग अशी मानवी विकासाची सर्वच गतिमान क्षेत्रे अत्यावस्थ आहे. आपण आज पाहतो आहोत की, टाळेबंदीतून सुटका होत नाही तोवर नवी टाळेबंदी जाहीर झालेली दिसते.. त्यात उथळपणामुळे राजकीय संवेदना बोथट झाली असून मानव सृष्टीशी काही घेणेदेणेच उरले नाही, असे सर्वसामान्यांना वाटायला लागले आहे. जागतिक पातळीवर 'प्रवासी मजूर' ही संकल्पना व त्यामागील अर्थकारणाबरोबर मुक्त शोषणाची पार्श्वभूमी जुनाच इतिहास सांगत आहे. मुक्त अर्थव्यवस्थेने बांधलेल्या आर्थिक उदारीकरणाच्या नावाखली मुक्त शोषण हे केवळ मानवी जगाचे दुर्भाग्य आहे. त्यातच अनेकांचे गेलेले रोजगार, भविृष्यात अधिकच वाढण्याची शक्यता आहे. मानवी वेठबिगारी, कुपोषण, उपासमार, गुलामी, गुन्हेगारी, शेजारी देशातील आपसातील गृहयुद्धे, जातीय, धार्मिक तेढ, सीमाप्रश्न, गरीब अविकसित राष्ट्राची कोंडी करून होणारी साधनसंपत्तीची लुट यासारखी मोठी विघातक संकटे मानवी समूहापुढे असणार आहे. मग ही संकटाची महायात्रा पुन्हा महानाशाकडे घेऊन जाईल का? की यातूनच संधीचे महाद्वार आपल्याला उघडे करता येईल? संक्रमण काळात मानवी समाजापुढे असे बरेच प्रश्न आहे. असे असले तरी मुळात हा संक्रमणकाळ नव्या परिवर्तनाची पहाट ठरावी एवढी साधने आणि युवासंख्या आपल्याजवळ आहे. सोबतीला आपल्या संस्कृतीत असलेली जीवनमूल्ये आपल्याच नव्हे जर जगाला आधार देईल एवढी क्षमता या मातीत आहे. त्यामुळे विकासाचे सुदर्शनचक्र आजच्या युवकांच्या सक्षम बोटात देणे योग्य ठरेल. त्यासाठी मात्र उदार राजकीय इच्छाशक्तीची इथे नितांत आवश्यकता आहे.

**भारतीय युवक व समाज वास्तव :**

भारतीय युवा भारताचे सामर्थ्य आहे. जवळपास त्रेसष्ट कोटी ज्याला युवा म्हणता येईल एवढी संख्या भारतात असून त्या मानाने कितीतरी पटीने नैसर्गिक साधनसंपदा भारताजवळ आहे. परंतु भारतीय

समाजाचे चित्र लक्षात घेता भारतीय समाज एकविसाव्या शतकातही वेगवेगळ्या समूहवाचक संकेत, परंपरा, जातीयता, चालीरिती, अंधश्रद्धा, धर्मवाद, लिंगभेद अशा जटील संकेतात अडकलेला आहे. सीमावाद, भाषावाद आतंकवाद, नक्षलवाद इ. बाबतीत कळस गाठलेला आहे. आज एकविसाव्या शतकाच्या वळणावर समाज आणि शासन यांच्यात सुसंवाद निर्माण होण्याची आम्ही आजही वाट पाहत आहे. लोकसंख्या नियंत्रणाचा फज्जा उडालेला आहे. विकासाच्या प्रक्रियेमध्ये शिक्षणक्षेत्रातील साचलेपण आणि वैचारिकता मूल्यात्मकता व नियोजन दारिद्र्यामुळे आजचा तरूण भरकटत चालला आहे. नैष्ठिक पातळीवर विचार करता आज हे चित्र सहज दिसून येते. ''एकट्या जुलै महिन्यात जवळपास पन्नास लाख पगारदारांना आपल्या रोजगारावर पाणी सोडावे लागले आहे.साधारणत: या कोरोना काळात १.८९कोटी बरोजगारीना कोरोना संकटाला तोंड द्यावे लागले आहे.''[२] परंतु साधनांची उपलब्धता असूनही रोजगारासाठीची वणवण, पोटासाठी चाललेली फरफड, नियोजनशून्य सत्ताकरणाची अरेरावी दर्शवित आहे. त्यामुळे एवढ्या मोठ्या प्रमाणात युवकांची संख्या उपलब्ध असूनही भारत दारिद्र्यात खितपत पडला आहे. कोरोनामुळे तर ही स्थिती अधिकच भीषण झालेली असून पुढे परिस्थिती अशीच राहिली तर याच युवाशक्तीला आटोक्यात आणणे फार कठीण होऊन बसेल, हे विसरता कामा नये.

**सामाजिक — सांस्कृतिक आव्हाने :**

भारतीय समाजातील जाती आज मोठी समस्या आहे. परंतु कधीकाळी याच जाती व्यवसायवाचक समूह होता. कृतिशीलता आणि कौशल्याचे वैशिष्ट्यपूर्ण रसायन जातीच्या ठायी असल्यामुळे स्वयंपूर्णता, आत्मनिर्भरता असे शब्द आपोआपच या समूहवाचक संज्ञेत समाविष्ट होत गेले. त्यासाठी तेव्हा कोणासही आव्हान करण्याची गरज पडली नाही. शेती व्यवसायात असलेला शेतकरी पारंपरिक शेती करीत होता. त्यावेळी कोणी शेतकरी आत्महत्त्या करीत नव्हता. परंतु सामाजिक पातळीवर असलेला व्यवसायाचे सांस्कृतिक रूपांतर होईपर्यंत सत्तांतराच्या संक्रमणात व्यवसायातील पवित्रापवित्रतेने समाजमन ढवळून गेले. उच्चनिचतेच्या भिंती बलवत्तर ठरून कार्यच श्रेष्ठ मानणारा समाज जातीयतेत अडकला. आज अर्थकरणाच्या धावपळीच्या युगात अजूनही सुटका होण्याची ाक्यता नाही आणि पुढे होईल की नाही हे देखील आज सांगता येण्यासारखे वास्तव नाही. भारतीय समाजापुढील अशी अनेक आव्हाने आहेत. त्यात जात, धर्म, पंथ, आपला, परका, उच्चनिच, गरीबश्रीमंत अशी अनेक आव्हाने सामाजिक व सांस्कृतिक पातळीवर सर्रास दिसून येते. या सर्व पातळ्यावर विचार करता पुढील काळात भारतासारख्या प्रचंड लोकसंख्या असलेल्या राष्ट्रापुढे युवा हेच एक मोठे आव्हान असणार आहे. त्यामुळे कोरोना संक्रमण काळाची व्याप्ती, त्यातून निर्माण झालेली सामाजिक व आर्थिक परिस्थिती पाहता या संकटकाळाला आपण संधी मानून जीवनाच्या प्रत्येक स्तरांवरील मूल्यांच्या उभारणीमध्ये युवकांचा सहभाग आवश्यक करता येईल का ते पाहून 'रोजगार साक्षरता अभियान' हाती घेतले पाहिजे. शिवाय ''धोरणात्मक नियोजनासाठी प्रशिक्षित मनुष्यबळाची गरज असते. भारताकडे शिक्षित मनुष्यबळ आहे. ''त्याचा अभ्यास करून आपली राष्ट्रीय स्तरावरची धोरणे आखणे गरजेचे आहे. त्यासाठी लागणाऱ्या प्रशिक्षण संस्था महाविद्यालये, अभ्यासक्रमातील दुरूस्त्या सुचविणे अत्यंत आवश्यक आहे. 'स्टार्ट अप इंडिया', 'स्मार्ट इंडिया', 'स्किल इंडिया' अशा योजनांची काटेकोर अंमलबजावणी करणे आवश्यक आहे.''[३]

डिजिडल भारताची घोषणा झाली तेव्हा या गोष्टी अशक्य वाटत होत्या त्या कोराना काळात शक्यतेच्या पातळीवर येताना दिसू लागल्या आहेत. समाजाच्या उत्थानासाठी समाजानेच प्रत्येक स्तरावर ही संसाधनविषयक माहिती पोहचती केली पाहिजे. अनावश्यक नियम व जाचक अटींवर बंधने घालून पुन्हा कुटीर उद्योगाना चालना देता आली पाहिजे. त्यासाठी भांडवल निर्मिती करणे आववश्यक आहे. आज बचत गट किती उपयोगी पडतो आहे याची जाणीव समाजातील प्रत्येकाला आहे. वितरण प्रणाली आदर्शवत करणारी संस्था म्हणून 'महिला बचत गट' फार उपयोगी ठरू शकतो हे वेगळे सांगण्याची गरज नाही. त्यातून 'प्राथमिक उद्योग प्रधिकरण' सहज उभे राहील व त्याअंतर्गत विविध योजनाची अंमलबजावणी सहज करता येईल. तेव्हाच कोव्हिड काळात भारतीय समाजाचा सद्यस्थितीत सुटू जाणारा तोल सामाजिक व सांस्कृतिक पातळीवर खऱ्या अर्थाने समतोल निर्माण करणारा ठरेल. अन्यथा भारताच्या विकासप्रक्रियेत अडसर म्हणून 'भारतीय युवक एक आव्हान' अशी समस्या निर्माण झाल्याशिवाय राहणार नाही, असे वाटते. तेव्हा भेदाभेदविरहित सकारात्मकता संधीची समानता जोपासणारी ठरेल असा कार्यक्रम सामाजिक पातळीवर राबविणे गरजेचे आहे.

**रोजगाराच्या संधी**

आज आपण कोरोना महामारीच्या प्रादुर्भावात वावरत आहोत. त्यामुळे आपल्याकडे आता रोजगार नाही, असे समजणे फारच घाईचे आणि चूकीचे ठरेल. याचे एक कारण हा संसार कार्यकारणभावाने बांधलेला आहे. वर म्हटल्याप्रमाणे विपत्ती कोणतीही असो जेव्हा संघर्ष अटळ होऊन जगण्यासाठी वा आवश्यक गरजांच्या प्रतिपूर्तीसाठी विचाराचे चक्र फिरू लागते तेव्हा नव्या संधीच्या वाटांचा शोध ही प्रवृत्ती प्रत्येक समाज घटकात कमीअधिक प्रमाणात सहज प्रत्ययास येते. श्रम कोणतेही असो ते श्रेष्ठच असते म्हणून श्रमाची पुज्यनीयता मानवी निष्ठेच्या केंद्रस्थानी असल्याचे दिसून येते. संधींचा उगम इथेच कुठेतरी असतो. अमूक एक म्हणतो म्हणून संधी नाही आणि तमूक एक म्हणतो म्हणून संधी आहे यातही अनेक संधी असू शकतात. कारण सकारात्मक चर्चा ही निराशा झटकून संधीकडे घेऊन जाणारी प्रकाशवाटच असते. म्हणूनच कोरोना काळात गावाकडे परतलेले कच्चे मजूर शेतीकार्यात आपले योगदान देत आहेत. कोणी शेतीवर आधारित व्यवसायाकडे वळले आहेत. शहरी बेरोजगारीला कोरोना काळात वैद्यकीय सामग्री पुरवठा व ऑफलाईन तसेच ऑनलाईन पद्धतीने मोठी सेवा देणारा वर्ग सर्वच पाहत आहे. व्यापाराची अनेक क्षेत्रे हळूहळू यात समाविष्ट होत आहे. भाजीपाला ही गोष्ट कधीकाळी ऑनलाईन अडचणीची वाटत होती शहरी भागात आज ही सेवा वेगवान होत आहे. उद्या थेट शेतातली भाजी घराघरात पोचेल आणि त्याचे परिणाम शेतकऱ्यांसाठी व ग्राहकासाठी देखील अत्यंत सकारात्मक ठरेल. 'मनरेगा'च्या माध्यमातून परतलेल्या अनेक कामगारांना रोजगार उपलब्ध झाल्याची अनेक उदाहरणे ताजी आहेत. डिजिटल शिक्षण प्रणाली अद्ययावत नसली तरी बरेच सहकार्य झालेले आहे, होत आहे. आणि या सर्वात युवकांसाठी रोजगाराच्या विविध संधी निर्माण करता येऊ शकणाऱ्या आहेत. उदा 'संगणक अभियंता' या विद्याशाखेकडे मधल्या काळात फार चांगल्या नजरेने पाहिल्या जात नव्हते परंतु आज मात्र त्यांच्याकडे इतरांना रोजगार देऊ शकतील एवढे 'स्पेस' नक्कीच निर्माण झाली आहे. आवश्यकता आहे ती भांडवल उभारणीसाठी शासन पातळीवर प्रेरणादायी मदतीची. तशी पावले विकासाच्या विविध शक्यताना संधीचे रूप देण्यासाठी केंद्र आणि राज्य शासनसंस्थातील यंत्रणा सरसावलेल्या आहेत. 'औद्योगिक हब' हेच विकासाचे स्त्रोत म्हणून

पाहण्याचे दिवस आता राहिलेले नाही. पृथ्वीची अपरिमित हानी टाळण्यासाठी 'एक गाव एक उद्योग' या संकल्पनेतून अनेक समस्या एकाचवेळी सुटू शकतील व रोजगारासंबंधीची 'वाणवा' या गोष्टी काल्पनिक ठरू शकतील परंतु जागेअभावी त्याची मांडणी इथे अशक्य आहे.

**समारोप :**

थोडक्यात, कोरोना संक्रमणकाळात रोजगार बुडाले. अर्थव्यवस्था रसातळाला गेल्या. जनजीवन अस्ताव्यस्त झाले. कृषी, औद्योगिक, व्यापार, बांधकाम, मनोरंजन इ. क्षेत्रे व तत्संबंधी व्यवसायावर निर्भर असलेला सर्वसामान्यातील एक मोठा वर्ग बेरोजगार झाला. असे असले तरी हे वर्तमान आहे. ते आपले उद्याचे भविष्य होऊ नये., यासाठी प्रयत्नशील राहीले पाहिजे. आज जरी आवश्यकतेपोटी काही उपाययोजना आपण करीत असलो तरी त्या सध्याच्या काळात कोणत्याही बाबतीत पुरेशा नाहीत ही समज ठेऊन उत्तरोत्तर नवनवे पर्याय शोधले जाणेच युवकांना संधी देणारे ठरणार आहे. मागील काळात अनेक प्रकारच्या साथीचा प्रादुर्भाव मानवी समाजावर प्रतिकुल प्रभाव टाकून गेला. त्यातून आपण सावरलो तरी कोरोना संकट या साथीपेक्षा निराळे आहे. उद्या हे संक्रमण जीवनाचा, जगण्याचा भाग झाले तर त्यासाठी आपण तयार असणे गरजेचे असल्याची जाणीव समाजाच्या सर्वच स्तरावरून व्यक्त होत आहे. त्यासाठी निर्धाराने उपलब्ध क्षेत्रात बदल करून जास्तीत जास्त संधी कशा निर्माण होतील व कालपर्यंत घराघरात अस्तित्वात असलेले व आजघडीस बंद पडलेले पारंपरिक लहानमोठे उद्योग 'स्वयंरोगार' या संकल्पनेखाली राबवावे लागणार आहे. त्यामुळे ज्ञानविज्ञानाबरोबर समाजातील विविध क्षेत्रात उद्याोगधंद्यांना एकाचवेळी मदत मिळत गेल्याने आजचा युवक येणाऱ्या संकटाचा सामना करू शकेल व भारताची वाटचाल आत्मनिर्भरतेकडे होण्यास खऱ्या अर्थाने मदत मिळेल.

**संदर्भ :**

१. दिलीप श. पाटील कोरोना व्हायरस एक संकट की संधी दि. डीएलएलई मुंबई विद्यापीठ मुंबई पृ.२
२. प्रा. मेघा किरीट कोरोनंतरच्या रोजगाराचे काय ? (ओआरएफ) दि. २८सप्टेंबर २०२०
३. दिलीप श. पाटील कोरोना व्हायरस एक संकट की संधी दि. डीएलएलई मुंबई विद्यापीठ मुंबई पृ.३